


# के. के. वाघमध्ये माजी विद्यार्थी उद्योजक मेळावा उत्साहात

**नाशिक : प्रतिनिधी**

के. के. वाघ शिक्षण संस्था नाशिकतर्फे माजी विद्यार्थी उद्योजक मेळावा नुकताच उत्साहात पार पडला. या उद्योजक मेळाव्यास ६० हून अधिक औद्योगिक, अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन, कृषी, औषधनिर्माण अशा विविध क्षेत्रांत मान्यवरांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यापैकी बहुतांश उद्योजक विविध कंपन्यांमध्ये उच्चपदावर कार्यरत आहेत.

यावेळी अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष व संस्थेचे जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर, प्राचार्य प्रा. पी. टी. कडवे, समन्वयक डॉ. व्ही. एम. सेवलीकर, डॉ. पी. जे. पवार, प्रा. व्ही. एस. कलमाणी, प्रा. एम. बी. झाडे व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष व संस्थेचे जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ यांनी उपस्थित उद्योजकांना मोलाचे मार्गदर्शन केले. औद्योगिक क्षेत्रात विविध पदांवर कार्यरत आहेत. त्याचे सर्व श्रेय के. के. वाघ शिक्षण संस्थेला जाते, अशा भावना उपस्थित उद्योजकांनी आपल्या मनोगतात व्यक्त केल्या. तसेच भविष्यात विद्यार्थ्यांच्या जडणघडणी, निधी उभारणी, प्रोजेक्ट, सेमिनार, ट्रेनिंग, औद्योगिक सहली, सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट आदींसाठी संस्थेने विनंती केल्यास, शक्य ती मदत करण्याची तयारी दर्शवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्वाती पवार यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.